REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2022

# भारताच्या सीमा समस्यांच्या समाधानासाठी:- राष्ट्रीय धोरण आणि त्याची अंमलबजावणी

**Prof. Dr. N. Z. Patil**
**Research Guide & HOD In Defence and Strategic Studies,**
**K.N.B.Art's College Navalnagar,Tal & Dist-Dhule(Maharashtra)**

## प्रस्तावना:-




15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या बाह्य व अंतर्गत सुरक्षेच्या समाधानासाठी भारताने आपल्या गतिशील परराष्ट्र धोरणाच्या माध्यमाने सर्व प्रकारचे प्रयत्न केलेत. तरीदेखील भारताची अंतर्गत व बाह्य सुरक्षा समस्या दिवसेंदिवस जास्तच कठीण होत गेलेली दिसून येत आहे. दक्षिण आशियाच्या केंद्रस्थानती भारताचे स्थान असल्याने संरक्षण, आर्थिक, वैज्ञानिक व संरक्षण संशोधनास सारख्या क्षेत्रात भारताने प्रगती तर केलेली आहे. परंतु कोणत्याही ठोस व प्रभावी शेजारी धोरणाच्या अभावाने मुख्य शेजारी राष्ट्रांबरोबर भारताचच्या सीमा संबंधी समस्या सुरू आहेत. तसेच त्याचे कोणतेही समाधान करण्यात भारताला यश आलेले दिसत नाही. येथे असा उल्लेख करणे आवश्यक आहे की, सन 1947 मधील स्वातंत्र्यप्राप्तीच्या आधी पंडित नेहरू ने सन 1946 मध्ये अंतरिम सरकारचे प्रमुख असताना भारताच्या संरक्षण धोरणावर प्रकाश टाकताना म्हटले होते की," भारत भविष्यात जगातील सर्व राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंधाच्या धोरणावर चालेल." परंतु तरीदेखील भारताच्या सुरक्षा समस्या निरंतर कठीण होताना दिसून येत आहेत.

भारताचा प्रादेशिक विस्तार, खनिज, संसाधने, भू सामरिक स्थिती व लोकशाहीला पाहता नेहरूंनी भारताला अमेरिका, रशिया, चीन नंतर भारताला चौथ्या क्रमांकाची शक्ती मानत होते. त्यांचे असे स्पष्ट मत होते की, " जग आमचा सन्मान करो किंवा नकरो आमचे स्थान जगाच्या नकाशातून नष्ट होऊ शकत नाही. त्याच बरोबर आमची एक निर्धारक व निर्णायक भूमिका आहे. दक्षिण आशिया तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या संदर्भात नेतृत्वाची ही भूमिका आम्हाला पार पाडावी लागेल. 21व्या शतकात भारत शक्ती केंद्र बनण्याची तसेच संयुक्त राष्ट्रसंघात स्थायी सदस्यत्व प्राप्तीसाठी तत्पर दिसत असला तरी, पाकिस्तान, चीन, नेपाळ, बांगलादेशासह इतर शेजारी राष्ट्रांबरोबर सुरु असलेल्या सीमा समस्या इतर द्विपक्षीय संबंधाच्या समाधानासाठी सतत प्रयत्नशील आहे.

## भारताच्या सुरक्षे पुढे पाकिस्तानी संकट:-

पाकिस्तान भारताच्या जवळचा शेजारी असण्याबरोबर अशा प्रकारचा कायमच शत्रु भावनेने ग्रसित आहे कि,त्यामुळे इच्छा असून देखील दोन्ही देश आपापसातील समस्या सोडू शकत नाहीत. काश्मीर समस्या भारत व पाक यांच्यातील अशी नाडी आहे की, ज्यामुळे भारत-पाक यांच्यात सन 1947,1965,1971,1999अशा चार वेळा संघर्ष करावा लागला. परंतु आज देखील ही समस्या जशी आहे तशीच कायम आहे. बाळा चा उपयोग करून काश्मीर प्राप्तीचा अनेकदा पाकिस्तानने असफल प्रयत्न केलेला आहे.स.न. 1990 च्या शतकात एकीकडे ऑपरेशन तोपक च्या माध्यमाने भारताविरुद्ध इन्सर्जन्सी कारवाया सुरू केल्या. त्याचबरोबर अण्वस्त्र प्राप्तीचा पूर्ण प्रयत्न केला. सिमला कराराच्या मूड मसुद्याचे हनन करत पाकिस्तानने काश्मीर समस्येचे आंतरराष्ट्रीयकरण करण्याचा

प्रयत्न केला. लाहोर घोषणा पत्राचे देखील पाकिस्तानने सन्मान केला नाही. पाकिस्तान दहशतवादी कृत्यांच्या माध्यमाने न केवळ भारताच्या अखंडतेवर आघात करण्यासाठी प्रयत्नशील आहे, परंतु चीन आणि नेपाळच्या माध्यमाने शक्यतो दबाव टाकण्याचे धोरण पाकिस्तानने कायम ठेवले आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात काश्मीर विवाद आज देखील स्थिर समस्या बनून दोन्ही देशांच्या द्विपक्षीय संबंधांना प्रभावित करीत आहे. भारत आणि पाकिस्तानातील लोकशाही सरकारे या समस्येचे समाधान शोधण्यात पूर्णपणे असफल राहिलेले आहेत. कारण पाकिस्तानी सरकार ISI तसेच सेनेच्या दबावातून कधी मुक्त होऊ शकले नाही. परवेज मुशर्रफ कडून वाजपेयींना शांती वार्ता करण्यासाठी आमंत्रित करणे त्यानंतर कारगिलच्या रूपात जे उत्तर दिले गेले जे पाकिस्तानच्या मूळ प्रवृत्तीला समोर आणण्यासाठी पुरेसे आहे. तरीदेखील भारताने पाकिस्तान बरोबर मैत्रीसंबंध निर्माण करण्यासाठी पुढील प्रमाणे प्रयत्न केले आहेत.

१- श्रीनगर-मुजफ्फराबाद बस सेवेच्या फेऱ्यांमध्ये वाढ तसेच यामार्गे ट्रक सेवेला सुरुवात केली, त्यामुळे व्यापारात वाढ केली जाऊ शकेल.

२- स्वातंत्र्या पूर्वी सुरू असलेल्या इतर मार्गावर बस सेवा सुरू करणे त्यात पुंच्छ - रावळकोट बस सेवा मुख्य आहे.

३- 1 जानेवारी 2006 पासून खोखरापार( राजस्थान)- मुन्नाकओ ( सिंध पाकिस्तान) यांच्यातील रेल्वेसेवा मुख्य आहे.

४- अमृतसर - लाहोर दरम्यान नियमित बस सेवा सुरू करणे.

५- पाकिस्तानातील धार्मिक स्थळ नानकाना साहिब पर्यंत बस सेवा सुरु करणे.

६- मुंबई तसेच कराचीत बंद पडलेले दूतावास पुन्हा सुरू करणे.

७- नियंत्रण रेषेवरील विलग झालेल्या कुटुंबांना जवळ आणणे, व्यापार, तीर्थयात्रा तसेच सांस्कृतिक आदान-प्रदान करण्याला प्रोत्साहन देण्यासाठी पुढच्या काळात जास्त सहकार्य करणे.

८- पाकिस्तान मार्गे इराण ते भारत यांच्यात गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी चर्चा करणे.

९- जम्मू-काश्मीरच्या मुद्द्यावर खऱ्या मनाने उद्देश पूर्ण चर्चेच्या माध्यमाने समाधान या पर्यंत पोहोचणे.

दोन्ही राष्ट्रांनी समग्र चर्चेच्या माध्यमाने ज्या मुद्द्यांवर सहमती व्यक्त केली असेल त्यावर कार्यवाही होईल अशा स्थितीपर्यंत पोहोचण्यापूर्वी २६/११च्या मुंबई घटनेने सर्व शांतता प्रयत्नांना मोठा आघात पोहोचविला आहे. हे त्याच बरोबर या गोष्टीची देखील पुष्टी झाली की, दहशतवाद्यांच्या निर्मूलनासाठी गठित संयुक्त तंत्र (Joint mechanism to fight terror) चे देखील पाकिस्तानच्या नजरेत कोणतेही अवचित्य राहिलेले नाही. सागरीमार्गे मुंबईत केल्या गेलेल्या पाक प्रेरित दहशतवादी हल्ल्याने भारताच्या सागरी सुरक्षा उपायातील न्यूनता उघड तर झालीच परंतु दुसरीकडे काश्मीर पासून वेगळ्या संपूर्ण भारतात कोठेही दहशतवादी हल्ल्याची पाकिस्तानची मनोवृत्ती सुद्धा यात उघड झाली. दुसरीकडे अमेरिकेने दहशतवादाने पूर्णपणे पीडित भारताला पुन्हा पाकिस्तानबरोबर चर्चा प्रारंभ करण्यासाठी दबाव वाढविला एवढेच नाही तर, पाकिस्तानच्या तर्कावर देखील सहमत इस प्रकट करण्यात थोडासा देखील संकोच केला नाही की, काश्मीर समस्या दक्षिण आशियातील दहशतवादाचे मुख्य कारण आहे. याठिकाणी उल्लेखनीय आहे की, 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबई वरील लष्कर- ए- तोयबा द्वारे प्रायोजित हल्ल्यात 289 लोकांची हत्या झाली. या घटनेत सामील असलेला दहशतवादी अजमल कसाब याला पकडल्यानंतर देखील पाकिस्तानने या हल्ल्यातील आपला सहभाग पूर्णपणे नाकारला त्याचबरोबर 26/11 चे मुख्य षडयंत्र कारी डेव्हिड हेडली याची साक्ष देखील पाकने अमान्य करण्यात थोडासा देखील संकोच केला नाही. एवढेच नाही हेडली संदर्भात अमेरिकेच्या कूटनीतीक डावपेचामुळे दहशतवादा प्रति त्याची रणनीती ची प्रवृत्ती उघड झाली. मुंबईच्या घटनेनंतर भारताचे पंतप्रधान मनमोहन सिंह यांनी 16 जुलै, 2009 मध्ये असे म्हटले होते की, "जोपर्यंत आपल्या भूमीचा दहशतवादासाठी चा वापर पाकिस्तान बंद करत नाही आणि त्याचे प्रमाण देत नाही, त्याच बरोबर दहशतवाद्यांवर कारवाई करणार नाही तोपर्यंत पाकिस्तान बरोबर कोणत्याही प्रकारच्या चर्चेचे वातावरण तयार होऊ शकत नाही." यानंतर शर्म-अल- शेख मध्ये संपन्न अलिप्ततावादी शिखर संमेलनात मनमोहन सिंह आणि गिलानी यांच्यात चर्चेनंतर 25 फेब्रुवारी, 2010 रोजी नवी दिल्लीत भारत व पाकिस्तान यांच्यात तत्कालीन विदेश सचिव (निरुपमा राव व सलमान बशीर) यांच्यात चर्चा संपन्न झाली. त्यात भारताचे विदेश सचिव आणि पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाशी संबंधित तीन महत्वपूर्ण दस्तऐवज सलमान बशीर कडे सोपविले. जरी पाकिस्तानी विदेश सचिव यांनी या द्स्तएवजाला केवळ साहित्यिक दस्तऐवज असे म्हटले,परंतु दहशतवादी कारवायांमध्ये पाकिस्तानचा हस्तक्षेप मात्र उघड झाला.

पुन्हा 26/27 डिसेंबर, 2011मध्ये मालदीवमध्ये संपन्न सार्क शिखर संमेलनात मनमोहनसिंह व गिलानी यांच्यात आण्विक व परंपरागत सुरक्षेसंदर्भात पुन्हा सी. बी. एम. स्तरावर चर्चा झाली. त्याअंतर्गत पाकिस्तानने भारताला आपल्या तोफा व मोर्तर(Morter) यांना नियंत्रण रेषेपासून तीस किलोमीटर दूर ठेवण्याचा प्रस्ताव ठेवला.दोन्ही राष्ट्रांमध्ये गोळीबार बंद करणे, सेनेने हालचाली चे डायरेक्टर जनरल च्या मध्ये हॉट लाईन ची स्थापना करणे, सागरी सुरक्षा व किनारी दलांच्या समन्वय यासंबंधी एजन्सी ची कार्यवाही संबंधी विषयावर विचार विनिमय झाला. या चर्चेच्या वेळी दोघांमध्ये दोन्ही पक्षांच्या सुरक्षा मुद्यांवर तर चर्चा झालीच परंतु सीमेवर दहशतवादी कारवायांच्या नियंत्रण संदर्भात कोणती सार्थ प्रगती झाली नाही.

पाक अधिकृत काश्मीर मध्ये पाकिस्तानी सरकारची इच्छा तसेच भारताविरुद्ध चीन- पाक मैत्री सेतूला दृढ करण्याच्या धोरणा अंतर्गत चीन कडून या क्षेत्रात केल्या जाणाऱ्या कारवाया भारतीय सुरक्षेसाठी चिंता जनक आहेत. पाक अधिकृत काश्मीरची भू- सामरिक व भू- राजनैतिक वैविध्यामुळे हे क्षेत्र तिबेट व शी किया प्रांताचे असे प्रवेशद्वार आहे. तेथील अल्पसंख्यांक लोकांच्या असलेले क्षेत्राची सामाजिक जनजातीय धोरणाला प्रभावित करू शकते. या क्षेत्रातील रहिवाशांची भाषा व संस्कृती जवळीकता पाकिस्तान बरोबर न जोडता तिबेटी, काश्मिरी, उजवे की, मंगोल व कवाली लोकांसारखी आहे. गिलगिट बाल्टिस्तान पासून जाणाऱ्या काराकोरम राजमार्ग द्वारेच चीन व त्याचा 'सदाबहार मित्र' पाकिस्तान बरोबर संपर्क स्थापन आहे. सत्य तर असे आहे की, दहशतवादी कारवायांनी असुरक्षित व अस्थिर चीनने प्रांत तसेच अशांत पाकिस्तान यांच्यात पाक अधिकृत गिलगिट- बाल्तिस्तान चा प्रदेश एक आघात क्षेत्र( बफर स्टेट) ची भूमिका पार पाडत आहे. चीन या क्षेत्रात पूर्वी तुर्की आणि इस्लामे आंदोलन च्या सक्रियतेने मुळे होत असलेली हिंसेमुळे फार चिंतीत आहे. सण 2009 मध्ये झालेल्या दंगली यांमुळे पाकिस्तानी दहशतवादी तत्वांचा संबंध चीनमधील दहशतवादी तत्वां बरोबर उघड झालेला आहे. प्रांताच्या सुरक्षेकरिता दहशतवादाला निपटून काढण्यासाठी पाकिस्तानी भूमीवर रणनिती कारवाया सुरु करण्याच्या प्रक्रियेला मूर्त रूप देऊन पाक अधिकृत काश्मीरवर आपली पकड मजबूत करण्यास प्रारंभ केला आहे. वाशिंग्टन मध्ये असलेल्या "गिलगिट- बाल्तिस्तान अध्ययन संस्था" चे प्रमुख शेंग सेरिंग चे मत आहे की, चीनने काश्मीर संदर्भात रुची घेऊन पाक अधिकृत काश्मीरच्या महत्त्वपूर्ण सामरिक क्षेत्रावर अधिकार स्थापन करणे तसेच पाकिस्तान, मध्यपूर्व अफगाणिस्थान बरोबर मिळून एक सुदृढ संबंधाच्या स्थापनेच्या दिशेनेएक संतुलित पाऊल उचलले आहे. अफगाणिस्तान व पाकिस्तान बरोबर मिळून चीन एक पामीर समूह च्या स्थापनेसाठी देखील प्रयत्नशील आहे. नुकतेच अफगाणिस्थान मध्ये जे सत्तापरिवर्तन झाले त्या ठिकाणी कायदेशीर सरकार तालिबान यांकडून उधळून लावून तेथे जी तालिबानी सत्ता स्थापन होत आहे. अशा या तालिबानी सत्तेला पाकिस्तान आणि चीन हे शुभेच्छा देखील दिल्या गेलेल्या आहेत. एकूणच आत्ताच्या घडामोडींकडे पाहता जे चीन आणि पाकिस्तानला हवे होते त्याच दिशेने घटना घडताना दिसून येत आहेत. आणि ही PCA पीसीए(पाकिस्तान, चीन, अफगानिस्तान) युती भारतासाठी किंवा भारताच्या भविष्यकालीन वाटचालीसाठी मोठा चिंतेचा विषय आहे यात कोणताही संशय नाही.

**वरील संदर्भात चीनचे खालील काही मुद्दे विशेष उल्लेखनीय आहेत.**

१- पाक अधिकृत काश्मीरच्या आर्थिक समृद्धी तसेच या क्षेत्राची आर्थिक निर्भर त्याला मजबूत आधार देण्यासाठी चीन या क्षेत्राच्या सामरिक महत्वाच्या विकास योजना( ज्यात रेल्वे, सडक, संपर्क, ऊर्जा इत्यादी) च्या निर्माणासाठी सक्रिय भागीदारी करून तेथे आपले स्थान आणि उपस्थिती साठी उत्सुक आहे.

२- काराकोरम हायवेला दहा मीटर पासून वाढवून तीस मीटर पर्यंत रुंद करणे तसेच त्याच्या देखरेखीसाठी पाचशे मिलियन डॉलर धनराशी ची व्यवस्था गिलगिट- बाल्टिस्तान या क्षेत्रात जग लॉट- स्कार्दू मार्ग( 165 किमी) तसेच जाकेट- सजीन मार्ग( 135 किमी) च्या निर्माण आवर 45 बिलियन डॉलर धन खर्च करून चीनने आपली अभिरुची प्रकट केले आहे.

३- झेलम नदी वर एक मुला बरोबर (Mangala Dham Reserviors) ला साठ फुटापर्यंत उंच करण्यासाठी चीन सक्रिय आहे.

४- 12. सहा बिलियन डॉलर खर्चाने " नीलम- झेलम" हायड्रोइलेक्ट्रिक पावर प्रोजेक्ट चे कार्य देखील प्राधान्याने करत आहे.

५- चीन गिलगिट- बाल्टिस्तान क्षेत्रात खालील पाच मेगा पॉवर प्रोजेक्ट वर काम करत आहे

| | | |
|---|---|---|
| १ | दासू हायड्रो पॉवर प्रोजेक्ट | 7.8 बीलियन डॉलर |
| २ | फानडारे प्रोजेक्ट | 70 मिलियन डॉलर |
| ३ | बासू हायड्रो पॉवर प्रोजेक्ट | 40.1 मिलियन डॉलर |
| ४ | हारपो हायड्रो पॉवर प्रोजेक्ट | 42.608 मिलियन डॉलर |
| ५ | युल्वो हायड्रो पॉवर प्रोजेक्ट | सहा बिलियन डॉलर |

६- 4 हजार 500 मेगावॉट विद्युत उत्पादन क्षमतेच्या 272 मीटर उंच डायमीटर भाषण डॅम निर्मितीसाठी चीनने बारा बिलियन डॉलर चा बजेट निर्धारित केला आहे.

एका रिपोर्टनुसार चीनच्या वेगवेगळ्या कंपन्या पाकिस्तानच्या जवळजवळ 250 योजनांमध्ये काम करत आहेत. त्यामुळे गिलगिट आणि बाल्टिस्तान च्या फक्त सतरा योजना मध्येच चीनच्या 122 कंपन्या कार्यरत आहेत. सॅग हरिसन च्या न्यू टाइम्समध्ये प्रकाशित एका अहवालात म्हटले गेले आहे की, जवळ जवळ 7000 ते अकरा हजार चिनी सैनिक आज पाक अधिकृत काश्मीरच्या गिलगिट- बाल्टिस्तान क्षेत्राच्या वेगवेगळ्या सामरिक केंद्रांवर उपस्थित आहेत. एवढेच नाही या गोष्टीचे प्रमाण मिळाले आहेत की, तमाम चिनी सैनिक पाक अधिकृत काश्मीरमधून संचालित अनेक योजनांमध्ये तांत्रिक कार्यात गुंतलेले आहेत. पाकिस्तानच्या विकास योजनांमध्ये जवळजवळ 3.3 बिलियन डॉलर चे ऋण देऊन चुकलेला चीन उर्जा व जल संकटाच्या आव्हानाच्या समाधानासाठी त्यावर समझोत्यासाठी दबाव निर्माण करीत आहे.

आर्थिक दृष्टीने दिवाळखोरीत निघालेल्या पाकिस्तान गृह युद्धाच्या दिशेने पुढे जाणाऱ्या पाकिस्तानची चीन वर निर्भरता वाढली आहे एकीकडे चीन पाक अधिकृत काश्मीरच्या नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून आपल्या स्थायी उपस्थितीला मजबूत आधार देऊन चुकला आहे. तर जम्मू-काश्मीरच्या 42 हजार 685 वर्ग किलोमीटर भूभाग आला हा जपण्याच्या दृष्टीने त्याच्या काश्मीर धोरणाचे नवीन आयाम सतत बदलताना दिसत आहेत. टोरंटो स्थित “शांती व लोकशाही संबंधी आंतरराष्ट्रीय संस्थान” चे निर्देशक मुमताज खानच्या पाक अधिकृत काश्मिरमध्ये चीनची वाढती महत्वकांक्षी संदर्भात असे म्हटले गेले आहे की, “ चीन पाकिस्तानला सैन्य व कूटनीती सहकार्य देऊन भविष्यात पाकिस्तानला प्रतिष्ठापीत करून काश्मीर समस्येचा मुख्य खिलाडी बनून पुढे येईल” एवढेच नाही तर या व्यतिरिक्त चीन पाकिस्तानच्या फाटा किंवा सिकिया सीमा क्षेत्राला लागून उत्तर पूर्व क्षेत्रात एक मोठा सैन्य आधार विकसित करण्याच्या योजनेवर सक्रीय आहे. त्यामुळे या क्षेत्राशी संलग्नित एक आदर्श भूवेष्टित क्षेत्र स्थापन निश्चित होऊ शकेल.

दुसरीकडे भारत द्विपक्षीय संबंधाबाबतच्या भावनेला मजबूत बनविण्यासाठी निरंतर सकारात्मक पावले उचलत आहे. भारताने एकीकडे पाकिस्तान ला पुढच्या तीन वर्षासाठी 264 वस्तूंच्या टेरिफ शुल्कात सवलत देण्याची घोषणा केली आहे. तसेच अमृतसर ते लाहोर साठी 500 मेगावॅट विद्युत देण्याच्या निर्णया व्यतिरिक्त कृषी, शिक्षण, पर्यावरण, सुरक्षा, स्वास्थ्य, आयटी, विज्ञान व तंत्रज्ञान तसेच पर्यटन यात सहकार्यासाठी वाढ होण्यासाठी एक तांत्रिक स्तरावर कार्यकारी समूह( ज्याला टेक्निकल लेवल वर्किंग ग्रुप) च्या स्थापनेत व देखील सहमती व्यक्त केले आहे. काश्मीर, दहशतवाद, सियाचीन तसेच पाणी सह विविध समस्या असून देखील भारत व पाकिस्तान एकविसाव्या शतकातील क्षेत्रीय व आंतरराष्ट्रीय भू-राजनीतिक तसेच आर्थिक क्षेत्रात सहकार्य विकसित करण्यासाठी प्रयत्नशील होते. परंतु पाकिस्तानातील इमरान सरकरच्या स्थापनेनंतर भारत-पाकिस्तान संबंधात कुठल्याही प्रकारचा बदल न होता संबंध अधिकच ताणले गेलेले आहेत आणि ताणले गेलेले संबंध पुन्हा मित्रत्वाचे होण्यासाठी पाकिस्तान कडून कोणत्याही प्रकारचा प्रयत्न केला जात नाही. उलट दहशतवाद्यांच्या मदतीने वारंवार हल्ले घडवून आणून भारताला पाकिस्तान कडून डिवचण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**चीन संबंधित भारताच्या सीमा सुरक्षा संदर्भातील आयाम:-**

भारत-चीन संबंधाच्या दिशेत चीनचे परराष्ट्र धोरणाची सफलता-असफलता, सरलता-जटिलता, अनुकुलता - प्रतिकूलता बरोबर आक्रमक साम्राज्यवादी व विस्तारवादी आहे. चीनची प्रबळ इच्छा आहे की, विशेष करून आशियात त्याचा एकाधिकार राहावा. त्यासाठी चीन कधीकधी दहशत, क्रांती, व कपटीपणा यासारख्या साधनाच्या माध्यमाने आपल्या शेजारी भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न करीत आहे. तर सीमांच्या संदर्भात भारताचे परराष्ट्र धोरण चिनी धोरणाच्या विरुद्ध आहे. त्यांचे हे धोरण शांतीपूर्ण सह अस्तित्व तसेच पंचशीला च्या सिद्धांतावर आधारित आहे. चीन जागतिक संदर्भात नेहमी असे दाखवण्याचा प्रयत्न करतो की, भारत आशियाई व्यवस्थेत कमकुवत राष्ट्र आहे आणि त्याची स्थिती दुय्यम दर्जाची आहे. भारताचे शक्ती च्या रूपाने पुढे येणे तसेच आर्थिक आणि राजनीतिक रूपात बलशाली होणे हे चिनी वातावरणात इर्षा, द्वेष आणि वैमनस्य याचे मुख्य कारण आहे. जागतिक स्तरावर साम्यवादी गटाला शिथिल करणे तसेच आशियाई नव स्वतंत्र राष्ट्रांमध्ये शक्ती संतुलन ढाच्याला बिघडवण्यासाठी चिन साम्राज्यवादी अमेरिकेला जागतिक वातावरण सकारात्मक करून दिले आहे. हे चीनच्या परराष्ट्र धोरणावर पक्ष व विपक्ष यांच्यात तुलनात्मक दृष्टीने विश्लेषण केल्यानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या विश्लेषकांनी स्पष्टपणे तर्क मांडले आणि निष्कर्ष काढले की, चीन सांगतो काही आणि करतो काही चीनी नेत्यांच्या चाली अस्पष्ट आणि अविश्वसनीय आहेत त्या कारणाने " हिंदी चीनी भाई भाई" च्या घोषणेला नाकारले गेले आणि चीनने भारतावर आक्रमण केले होते. यासंदर्भात पामर तसेच पर्किन्स ने असे म्हटले आहे की, "चीनचे परराष्ट्र धोरण चारा आणि छडी" सारखे दिसून येते. अर्थात मुखात राम आणि बगलेत सुरी असेच पाकिस्तानचे धोरण आहे

आंतरराष्ट्रीय राजकीय व्यासपीठावर चीनची भूमिका फारच महत्त्वपूर्ण होताना दिसून येते. आज दरडोई उत्पन्नाच्या आधारावर चीन जगातील दुसरी सर्वात मोठी महाशक्ती आहे. तसेच चीन सतत आपल्या आशियातील प्रतिस्पर्धी भारताला दक्षिण आशियात गुंतवून ठेवण्याच्या उद्देशाने न केवळ भारताविरुद्ध गंभीरता पूर्वक सीमा अतिक्रमण करत आहे, एवढेच नाही तर पाकिस्तानच्या माध्यमाने चीन भारतावर दबाव वाढविण्यासाठी कोणती संधी सोडू इच्छित नाही. आपल्या विस्तारवादी प्रवृत्तीच्या पूर्तीसाठी चीन आज देखील राजनीती वर कायम आहे. चर्चेच्या समांतर चीनकडून तिबेटी जनतेवर अनेक प्रकारची जबरदस्ती करणे, तेथील लोकसंख्येत कमी आणणे त्याचबरोबर भारत-चीन सीमेच्या पूर्व-पश्चिम सेक्टरमध्ये आपल्या साम्राज्यवादी मनसुब्यांना प्रत्यक्षात आणणे सुरू ठेवले आहे. सन 2012-13 मध्ये चिनी सैनिकांनी भारतीय सीमेचे जवळ जवळ चारशे वेळा उल्लंघन केले त्यातील 90 टक्के सिमातीक्रमण लडाखच्या क्षेत्रात पाहायला मिळाले आहे. पूर्व क्षेत्र मध्ये चीन अरुणाचल प्रदेशात आपला दावा प्रस्तुत करत आहे. त्याचबरोबर चीन या प्रदेशाला दक्षिणेतील भेट म्हणत आहे. उल्लेखनीय आहे की, अरुणाचल पासून चीन मध्ये जाणाऱ्या भारतीयांना असे म्हणत विसा देण्याचे नाकारले कि, हा प्रदेश तर चिनचा आहे. ऑक्टोबर 2009 मध्ये पंतप्रधान मनमोहन सिंह यांनी अरूणाचल दौऱ्याच्या वेळी देखील चीनने प्रक्षोभक वक्तव्य करून परिस्थिती बिघडण्याची चाल चालवली होती. परंतु चीनने पश्चिमी सेक्टर मध्ये लडाख मध्ये ज्या प्रकारची जमीन मार्गे घुसखोरी केले आहे तसेच हिम्मत पूर्व सेक्टरमध्ये अरुणाचलमध्ये चिन्हे दाखविले आहे. तिकडे दक्षिणी चीन सागरात देखील आपली दादागिरी दाखवायला सुरुवात केलेली आहे. जपानच्या सागरी क्षेत्रात चीन आपला मालकी हक्क सांगत असतो मे 2013 मध्ये जपानी सागराच्या जवळपास तीन चिनी जहाजे पाहिले गेल्यानंतर चीन-जपान यांच्यात तणाव निर्माण झाला होता .

१-17 जून 2013 रोजी चिनी सैनिक चुमार क्षेत्रात घुसले आणि तेथे भारतीय कॅमेरे तोडून टाकलेत त्यावेळी भारताचे संरक्षण मंत्री ए. के. अँटोनी यांचा चीन दौरा निश्चित झालेला होता.

२- तीन जुलै 2013 रोजी संरक्षण मंत्री ए. के. अँटोनी यांच्या चिनी यात्रे आधी चीनच्या जनरलने धमकी दिली की, भारताने सीमेवर जास्त पुढे येऊ नये.

३- 9 जुलै 2013 रोजी चिनी सैनिकांनी लडाखच्या सुमान च्या गाव वाल्यांना हिंदीमध्ये धमकावले " इलाका खाली करदो" यानंतर लगेचच चीन बरोबर फ्लॅग मीटिंग घेण्यात आली.

४- 17 जुलै 2013 रोजी पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली कॅबिनेटने भारत-चीन सीमेवर 50000 अतिरिक्त सैनिकांच्या तैनातीला मंजुरी दिली.

चीन भारत-चीन सीमेवर सतत आक्रमकता दाखवून भारतावर दबाव निर्माण करून आपला विस्तार वाढ सतत पुढे रेटण्याचा प्रयत्न करत आहे. याचाच भाग म्हणून चिनने 2020 मध्ये डोकलाम प्रदेशात अनेक भारतीय हद्दीतील प्रदेशावर आपल्या

सैनिकांची घुसखोरी केली. यावर चीन थांबला नाही तर भारतीय सैनिकांना धावण्याचा देखील प्रयत्न केला गेला त्यात भारताचे जवळ जवळ वीस-बावीस सैनिक शहीद झाले भारतीय सैनिकांनी देखील चीनच्या या कारवाईला जशास तसे उत्तर दिले आणि त्यात भारतीय सैनिकांनी देखील चीनच्या जवळ जवळ 50 सैनिकांना मारले. चीनने चीनी सैनिकांचे मारले गेल्याची बातमी अनेक दिवस मान्य देखील केली नाही. कारण चीनने जर त्यांचे एवढे सैनिक मारले गेले आहेत असे जर स्वीकारले असते, तर त्यांची नाचक्की झाली असती. म्हणून अनेक दिवस ती माहिती लपवून ठेवण्याचा प्रयत्न केला त्यानंतर देखील मात्र चीनने पुन्हा पुन्हा भारतावर वेगळ्या पद्धतीने दबाव आणण्याचा प्रयत्न केला. परंतु पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली व त्यांच्या कणखर भूमिकेमुळे चीनला शेवटी भारता बरोबर सीमा समस्येवर चर्चा करायला भाग पाडले गेले. एवढेच नाही तर विवादित क्षेत्रातील सैनिकांना चीनने मागे घ्यायला देखील सुरुवात केली. आणि अलीकडे भारत-चीन यांच्यातील वाद थोडा थंडावलेला दिसून येत आहे.

2014 नंतर भारतात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात एनडीए सरकार अस्तित्वात आले आणि तेव्हापासून भारत-अमेरिका संबंधांमध्ये जी एक जवळीक निर्माण झाली, त्या जवळीकीमुळे चीन अक्षरशः भांबावून गेला आहे. भारताची मैत्री फक्त अमेरिकेबरोबरच्या वाढली असे नाही तर मोदींच्या नेतृत्वात 2014 नंतर जगातील अनेक देशांशी भारताचे मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झालेत त्यात जपान, ऑस्ट्रेलिया, रशिया, ब्रिटन यासारख्या अनेक देशांशी भारताचे द्विपक्षीय संबंधांमध्ये वाढ झाली. भारताची आज प्रचंड प्रमाणावर दिशा आणि दशा बदलतात चाललेले आहे. संरक्षण क्षेत्रात भारत अनेक देशांशी करार करून संरक्षणासाठी लागणाऱ्या अनेक वस्तूंचे निर्माण भारतातच करू लागलेला आहे या सगळ्या गोष्टी चीनला निश्चितच नर उचलणाऱ्या आहेत. म्हणून भारताचा होत असलेला उत्कर्ष, भारताची आंतरराष्ट्रीय राजकारणात वाढत असलेली प्रतिष्ठा, भारताचे शक्तिशाली होणे हे चीनला निश्चितच बेचैन करणारे आहे. आणि म्हणून चीन येन केन प्रकारे भारतीय विकासाचा रथ पुढे जात आहे त्याला विखंडित करण्याचा प्रयत्न करीत आहे आहे.

### भारत-बांगलादेश समीकरण:-

भारत आणि बांगलादेश यांच्यात 4095 किलोमीटर ची भू व जल सीमा असूनती पूर्व उत्तर भारताच्या सुरक्षेसाठी एक गंभीर आव्हान आहे. ही सीमारेषा ब्रिटिश कालीन भारताची अशी महत्त्वपूर्ण सीमारेषा आहे की, या सीमारेषा जवळील लोकसंख्या तसेच त्यांचे धार्मिक व सामाजिक स्वरूप न केवळ भारताची अर्थव्यवस्था तसेच सामाजिक संरचनेला प्रभावित करत आहे. परंतु परराष्ट्र धोरणाच्या निर्धारण आत देखील हे तत्व केवळ कोणत्या न कोणत्या स्वरुपात प्रभावित आहे. या क्षेत्रातदेखील हिंदू-मुस्लिम क्षेत्राचे विवाद विद्यमान आहेत. परंतु 'रेड क्लिप' सीमारेषेचे द्वारे येथील नकाशा निश्चित नसल्याने भारत-बांगलादेश संबंधाच्या निर्धारणात तसेच विवशता चे लक्षण दिसून येतात. या अस्पष्ट विभाजनावर पंडित नेहरू आणि लियाकत अली खान यांच्यात हस्ताक्षर केलेल्या एका करारानुसार रेड क्लीप योजनेचे फलस्वरूप निर्माण झालेला विवाद सोडविण्यासाठी न्यायमूर्ती वेग त्यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन केले गेले होते. परंतु समस्येचे कोणतेही सम्यक समाधान शोधता आले नाही. या अंतरद्वंद्वावर बोलताना नेहरूनी लोकसभेमध्ये म्हटले होते की, " They laid down rule that, we should accept broadly speaking the boundaries of districts are talukas or administrative areas. when the internal administrative boundaries also became International frontiers it makes a difference. one side of the rivers is sometimes described as the other side maps are attached to this description but they do not Tally. sometimes river is named and there is doubt as to which river is meant." रेड क्लिप सीमा रेषा विवाहासंबंधी जी धरोहर मिळाले त्याच्या समाधानासाठी 31 डिसेंबर रोजी सीमा निराधारांसाठी इंदिरा गांधी आणि मुजिबुर रहमान यांच्यात भू-सीमा समझोता( लँड बॉर्डर एग्रीमेंट) अवश्य झाला. परंतु जलपायगुडी संबंधित डेकाटा तसेच त्रीपुरा बॉर्डर शी संलग्न माहुरी शी संलग्न 6.5 किलोमीटरची सीमारेषा विवादित आहे. त्यामुळे दोन्ही राष्ट्रांमध्ये दोन्ही सीमेवर अनेक वेळा सैन्यांमध्ये एकमेकांवर हल्ले होऊन चुकले आहेत. मछुरा नदीचा प्रवाह सतत बदलत राहिल्याने या क्षेत्राचे सीमांकन दोन्ही देशांसाठी एक मोठे आव्हान आहे. जरी दोन जुलै 1973 रोजी भारताचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री सरदार स्वर्ण सिंह यांनी बांगलादेश बरोबर सीमांकन संबंधी मुद्द्यावर असे म्हटले होते की, दोन्ही राष्ट्रांनी मैत्रीपूर्ण वातावरणात याचे समाधान करू शकतात परंतु असे होताना दिसत नाही. भारत-बांगलादेश यांच्या "तीन बिघा जमीन" ही समस्या आज देखील ज्वलंत आहे. त्या बाबतीत दोन्ही राष्ट्र संवेदनशील बनले आहेत. एवढेच नाही भारत बांगलादेश यांच्यात इंक्लोव ही समस्या देखील गंभीर आहे.त्याअंतर्गत भारतात 51 बांगलादेशी एंक्लेव आणि बांगलादेश मध्ये एकशे अकरा भारतीय इंक्लोव भारत-बांगलादेश सीमेवर

विवादाचा मुद्दा बनलेले आहेत. ही समस्या नागरिकत्व संबंधीची अत्यंत ज्वलंत सीमा वाढलेले आहे. या समस्येवर विचार प्रकट करताना पंडित नेहरूंनी म्हटले होते की, " In regards to exchange small territories we don't want migration from them, as far as possible, and we advise the people to continue living there and except the country to which they will belong." बांगला देशासंबंधी वरील संदर्भात सीमा समस्येच्या समाधानासाठी हा सुवर्णक्षण आहे. त्या दोन्ही राष्ट्रांनी मिळून न केवळ आपल्या सीमा समस्येच्या समाधानासाठी संवैधानिक मार्ग शोधू शकतात परंतु त्यामुळे प्रभावित जवळजवळ 51 हजार लोकांचे भविष्य निश्चित होऊ शकते. उल्लेखनीय आहे की, हे क्षेत्र " राष्ट्र विरहित सार्वमत लोकतंत्र" बनून राहिलेले आहे. हे क्षेत्र तस्कर, दहशतवादी, चोरटे शस्त्र विक्री आणि अवैधपणे घुसखोरी करणाऱ्यांचा अड्डा बनलेले आहे. एवढेच नाही तर जिहादी गट, आय एस आय देखील यांचा उपयोग स्वतःसाठी करताना दिसते.

जरी भारताने या प्रलंबित मुद्द्यांच्या समाधानासाठी तसेच संयुक्त सीमा प्रबांधन साठी एक करारावर स्वाक्षरी केलेल्या आहेत परंतु हे तोपर्यंत शक्य नाही की जोपर्यंत विवादित क्षेत्राचा मुद्दा सुटत नाही. मार्च 2013 मध्ये आपल्या ढाका यात्रेच्या वेळी भारताचे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी ढाका विश्वविद्यालयाच्या एका सभेत बोलताना म्हटले होते की, हा समझोता अनुमोदना साठी भारतीय संसदेपुढे ठेवला जाईल. परंतु ते अजून पर्यंत शक्य होऊ शकले नाही. एवढेच नाही यावेळी भारत-बांगलादेश दोन्ही देशांचे सरकारान समोर हा एक सुवर्ण संधी आहे की, त्यांनी उदारवादी दृष्टिकोनाचा परिचय देत तिस्ता जल आणि भू-सीमा करारावर ऐतिहासिक निर्णय घेण्याची संधी हातातून जाऊ देता कामा नये. ममता बॅनर्जी आणि आसाम गण परिषद या प्रकारच्या समजू त्यावर विरोध तर आवश्यक करत आहेत. परंतु भारत सरकारला हे लक्षात ठेवले पाहिजे की, परराष्ट्र धोरणाचे निर्धारण हे राष्ट्र कडून निर्धारित केले गेले पाहिजे राज्याकडून नाही. राज्यांकडून निर्धारित परराष्ट्र धोरण कोणत्याही प्रकारे योग्य तसेच खरे नाही. म्यानमारच्या रोहतांग नागरिकांची भारतात होणारी घुसखोरी अंतर्गत सुरक्षेसाठी एक नवे आव्हान आहे.उल्लेखनीय आहे की, रोहतांग आणि म्यानमारमधील लोक बांगलादेशाच्या चतगाव मध्ये हजारो बौद्ध चकमा नरसंहाराचे अपराधी आहेत. त्यांना बांगलादेश व म्यानमार दोघांनीही वरील हत्या कारण्यासाठी हाकलून लावले आहे. हैदराबाद, पंजाब, जम्मू, जलालाबाद, मेरट, दिल्ली आणि खुर्जा मध्ये हजारो रोहतांग म्यानमारी येऊन बसले आहेत. मे 2012 या शरणार्थी ने हजारोच्या संख्येत दिल्लीतील संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यालय जवळ एकत्र येऊन भारतात शरणार्थीचा दर्जा मिळविण्याची मागणी केली होती. सरकारच्या निष्क्रियतेमुळे जर या लोकांनी रेशन कार्ड तसेच आधार कार्ड प्राप्त करण्यात जर सफलता प्राप्त केली तर ते भारताच्या अंतर्गत सुरक्षा पुढील एक गंभीर आव्हान ठरेल. भारत आणि नेपाळ यांच्यातली होली सीमा देखील अवैध घुसखोरी तसेच तस्करीसाठी प्रोत्साहित करून भारताच्या अंतर्गत सुरक्षेला प्रभावित करत आहे. भारताने या घुसखोरांना रोखण्यासाठी सीमेवर सुरक्षा संदर्भात कठीण पाऊले उचलणे ही काळाची गरज आहे

## संदर्भ:-

१.The The Indian Express February, 15, 2010

२. The Indian Express March, 2018

३.Thepioneer 28 December 2018

4. Economic Times, September 10, 2011
5. van schendel, The Bengal borderland beyond state and Nation in South Asia, London, Anthem South Asian Studies, 2005,p-44
6. Nehru India's foreign policy: selected speeches September 1946 April 1961, Publication division, Government of India, 1961,p-496
7. 1st AC analysis volume- 35 number- 5 September 2011,p-747
8. A.S.Bhasin, India Bangladesh relation documents,- 1971- 2002, volume-4 , 2003,p-1893
9. Nehru, Indian Foreign Policy; selected speeches, September 1946, April 1961 Publication division Government of India, 1961,p-494
10. Shekhar Gupta, Dainik Jagran, 3 September 2013,p-6